# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

दैनिक ऐक्य, सातारा.

# कष्ट केल्याशिवाय फळ मिळत नाही : प्रा. शिंदे

▲ पाटण, दि. ६ : स्पर्धेच्या युगात आपल्याला टिकायचे असेल तर आपण सातत्याने कष्ट केलेच पाहिजेत. कष्टाशिवाय फळ मिळत नाही, असे मत राष्ट्रीय सेवा योजनेचे सातारा जिल्हा समन्वयक प्रा. कोंडिबा शिंदे यांनी व्यक्त केले.

येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्यावतीने ढोरोशी येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे सदस्य शरद देशमुख होते. यावेळी संचालक संजीव चव्हाण, बाळासाहेब देसाई कॉलेजचे प्र. प्राचार्य डॉ. व्ही. ए. कळंत्रे, ढोरोशी गावच्या उपसरपंच सौ. सुवर्णा मगर, डॉ. आर. टी. सपकाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.



मार्गदर्शन करताना प्रा. कोंडिबा शिंदे, समवेत शरद देशमुख, संजीव चव्हाण, डॉ. व्ही. ए. कळंत्रे व इतर.

प्रा. शिंदे म्हणाले, जीवन जगत असताना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत असते. प्रतिकूल परिस्थितीत मात करण्याची क्षमता महाविद्यालयीन जीवनामध्येच प्रत्येकाच्या जीवनात निर्माण झाली पाहिजे आणि त्यासाठी अशा प्रकारचे श्रमसंस्कार शिबिरे आपण आयोजित करणे आणि त्यात सहभागी होणे गरजेचे आहे.

संचालक संजीव चव्हाण म्हणाले, श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून आपल्याला जीवनाचे धडे मिळत असतात. येणाऱ्या परिस्थितीत तडजोड कशी करावी याचे धडे आपल्याला गिरविता येऊ शकतात आणि त्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. शरद देशमुख म्हणाले, एनएसएसच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास आणि आत्मविश्वास वाढतो. आपण सर्वांनी अशा प्रकारच्या शिबिरात सहभागी झाले पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या विविध श्रमसंस्कार शिबिरातून युवकांचा व समाजाचा विकास होतो.

एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण गणगे यांनी प्रास्ताविकात दि. २९ डिसेंबर २०२५ ते दि. ४ जानेवारी २०२६ या कालावधीत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ज्युनियर विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बजरंग चव्हाण यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

प्रा. डॉ. सौ. एस. एस. कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमास शामराव मगर, ग्रामपंचायत ढोरोशीचे सदस्य अण्णा पुजारी, पोलीस पाटील राहुल पुजारी, प्रतापसिंहराजे भोसले हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अनिल मोहिते, एनएसएस सदस्य प्रा. प्रदीप गायकवाड, प्रा. विशाल कांबळे यांच्यासह ज्युनियर व सीनियर विभागातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.